**<u>अंतकालीन नफा क्र. ०१/२०१९</u>**
**<u>निशाणी २० पुढे सुरु....</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>गैरअर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांच्यामार्फत उलटतपास</u>**

११. प्लॉट नं. २७२९ शिट नं. ४० ची दिनांक १३.०१.२०२१ व दिनांक १६.०१.२०२१ रोजी मोजणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३.०१.२०२१ व दिनांक १६.०१.२०२१ रोजी झालेल्या मोजणीत सुरेश किसनराव शेलार यांचा दावा मिळकतीवर ताबा दिसुन आला म्हणुन मी मोजणीवर हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला ती मोजणी पटली नाही म्हणुन मी त्यावर आक्षेप घेतला व फेरमोजणीची विनंती केली. मी केलेल्या विनंतीनुसार न्यायालयाने फेरमोजणीचे आदेश दिले व मिळकतीची फेरमोजणी झाली. मी फेरमोजणीचा नकाशा पाहिला नाही. त्या नकाशाची नक्कल मी काढली नाही, माझे वकीलांनी काढली किंवा कसे मला माहित नाही. सदर फेरमोजणी मागच्या वर्षी सन २०२४ मध्ये झाली. सदर फेरमोजणीचा नकाशा काढुन मी माझे वकीलांकडुन तो समजुन घेण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे त्या मोजणीमध्ये काय लिहिलेले मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी झाली त्यावेळी मी आजुबाजुचे लोकांना साक्षीदार म्हणुन बोलविले होते. मी मोजणीदाराची साक्ष घेणार आहे की नाही ते माझे वकील साहेब सांगतील. मी आजुबाजुचे लोकांची साक्ष घेणार आहे की नाही ते माझे वकील सांगतील.

१२. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉट नं. २७२९ पासुन २०–२५ फुटावर माझे मुलाचे पानपट्टीचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलाचे पानपट्टीचे दुकान जवळपास २५ वर्षापासुन आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, पानपट्टीचे दुकानाला १०-१५ वर्ष झाले असतील. मला आठवत नाही की, सन २००५ मध्ये नगरपालिकेने अतिक्रमण मध्ये माझ्या मुलाचे पानपट्टीचे दुकान हटविले होते. नगरपरिषदेने अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविली होती किंवा कसे माझे लक्षात नाही. (साक्षीदाराला पुन्हा पुन्हा प्रश्न विचारुन देखील त्यांना प्रश्न समजत नाही किंवा त्यांना प्रश्न समजत असुनही प्रश्न न समजण्याचे ढोंग करीत आहे असे दिसुन येते.) हे म्हणणे खरे नाही की, मला प्लॉट नं. २७२९ बाबत मागील २०-२५ वर्षापासुन काहीच माहित नाही.

१३.	फकीरा जाधव यांनी नगरपरिषद विरुध्द दावा दाखल केला होता किंवा कसे मला माहित नाही. मला माहित नाही की, नगरपरिषदेने दिनांक १७.०७.२००५ रोजी शिट नं. ४० प्लॉट नं. २७२९ मधील दुकान पाडले होते किंवा कसे. मला माहित नाही की, त्याच दिवशी नगरपरिषदेने माझ्या मुलाचे दुकान पाडले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०७.२००५ रोजी दुकान पाडल्यानंतर मी दुकानातील साहित्य मिळणेकरीता नगरपरिषदकडे अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अर्जावर दिनांक १९.०७.२००५ रोजी आदेश होवुन ६ टिनपत्रे, बांबुचे ८ नग, लाकडी बल्लया ४ नग आणि इतर साहित्य असे मिळाले. नगरपरिषदेने अतिक्रमण काढल्यानंतर फकीरा जाधवने शनैश्वर दुकान बांधले. फकीरा जाधवने त्यांचे दुकान स्वतःचे खर्चाने बांधले किंवा कसे मला माहित नाही. नगरपरिषदने अतिक्रमण मोहिम राबविली त्यावेळी अतिक्रमीत जागेत बांधलेली सर्व दुकाने पाडली होती. अतिक्रमण हटाव मोहिमेत माझे मुलाचे दुकान पाडले व त्यानंतर माझ्या मुलाने त्या ठिकाणी नविन दुकान बांधले किंवा कसे मला माहित नाही.

१४.	मला दिशा समजतात. हे म्हणणे खरे आहे की, शनैश्वर जनरल स्टोअरच्या दक्षिणेकडुन सुरेश किसनराव शेलार यांचे दुकान आहे. सुरेश किसनराव शेलार यांचे दुकानाचे नाव माँ सप्तश्रृंगी विट सप्लायर्स आहे. मी दोन्ही मोजणीच्या वेळी हजर होतो. दोन्ही मोजणी झाल्या त्यावेळी सुरेश किसनराव शेलार यांच्या दुकानाची मोजणी केली किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही मोजणीमध्ये शिट नं. ४० प्लॉट नं. २७२९ सुरेश किसनराव शेलार यांचे ताब्यात आढळुन आले. सुरेश किसनराव शेलारचे माँ सप्तश्रृंगी विट सप्लायर्स दुकान सन २००५ पासुन आहे किंवा कसे मला माहित नाही. सुरेश किसनराव शेलारचे माँ सप्तश्रृंगी विट सप्लायर्स चे दुकान आहे त्या ठिकाणी पुर्वी महादेव बाराहातेचे दुकान होते. मला आठवत नाही की, महादेव बाराहातेचे दुकान नगरपरिषदने सन २००५ मध्ये अतिक्रमण हटाव मोहिममध्ये पाडले होते किंवा कसे. मला माहित नाही की, महादेव बाराहातेचे दुकान पाडल्यानंतर त्या ठिकाणी सुरेश किसनराव शेलारने माँ सप्तश्रृंगी विट सप्लायर्स दुकान बांधले. साक्षीदार पुन्हा सांगतात की, महादेव बाराहातेचे दुकान पाडल्यानंतर त्या ठिकाणी सुरेश किसनराव शेलारने माँ सप्तश्रृंगी विट सप्लायर्स दुकान बांधले. हे म्हणणे खरे नाही की,

नगरपरिषदेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर त्या ठिकाणी फकीरा जाधवने त्यांचे शनैश्वर जनरल स्टोअर दुकान बांधले व ते आजतागायत त्या सरकारी जागेवर सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०७.२००५ पासुन त्या जागेवर फकीरा जाधवचे शनैश्वर जनरल स्टोअर दुकान असल्याचे मला माहित आहे.

१५. सन २००३ मध्ये फकीरा जाधवने मी दाखल केलेल्या दाव्या विरुध्द अपील दाखल केले होते व ते अपील मंजुर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपील विरुध्द मी सन २०११ मध्ये मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, सन २००५ मध्ये शनैश्वर दुकान पाडले म्हणुन मी ८ वर्षानंतर सन २०११ मध्ये मा. उच्च न्यायालयात अपील केले. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी ताबडतोब गेलो होतो.

प्रश्न – प्लॉट नं. २७२९ शिट नं. ४० या प्लॉटला नगपरिषदचा टॅक्स लागत नाही ?

उत्तर – नझुलचा कर राहतो, नगरपरिषदेचा राहत नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०७.२००५ पासुन फकीरा जाधवचे त्यांचे शनैश्वर जनरल स्टोअर दुकान प्लॉट नं. २७२९ शिट नं. ४०नाही असे माहित असतांना देखील मी फकीरा जाधव यांचे विरुध्द खोटा अर्ज दाखल केलेला आहे व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुरावा शपथपत्रातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.07.11 11:28:38 +0530

दिनांक : १०/०७/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.